# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र. मुमाआ/नों.क्र.१२५९/२१/अ.क्र.३१४/२५

श्री.हितेश बाळ साटम
५, गंगा भूवन, केव्हस् रोड, जोगेश्वरी (पू.),
मुंबई-४०० ०६०.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) के/पूर्व
सहाय्यक अभियंता (इ. व का.) के/पूर्व यांचे कार्यालय,
१ ला मजला, आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पू.), मुंबई-४०० ०६९.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ. व का.) के/पूर्व
सहाय्यक अभियंता (इ. व का.) के/पूर्व यांचे कार्यालय,
१ ला मजला, आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पू.), मुंबई-४०० ०६९.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २०.०३.२०२५**

अपीलकर्ता : अनुपस्थित.
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ३०-०१-२०२० | -- | २१-१२-२०२० | -- |

अपिलकर्तांनी जन माहिती अधिकारींचे उत्तर आणि प्रथम अपिलीय अधिकारींनी आदेश न दिल्यामुळे दि.०९-०२-२०२१ रोजी आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि.३०-०१-२०२० अन्वये Gowardhan Complex (Shree Goraksha League) situated at the Plot No.6, C.T.S. No. 228 and 228/1 to 24, S.No.11, Hissa No.5 (pt) lying, being at Village Majas, Caves road, Jogeshwari East, Mumbai-60 या विषयाच्या माहितीची मागणी केलेली आहे.

जन माहिती अधिकारींनी माहिती न दिल्याने अपिलकर्तांनी दि.२१-१२-२०२० रोजी प्रथम अपिल दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिकारींचे आदेश अभिलेखात उपलब्ध नाहीत.

अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि.०९-०२-२०२१ रोजी जन माहिती अधिकारींनी मुद्दा क्र.७ ची माहिती दिली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपिलकर्ता कोणतीही पूर्वसूचना न देता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांनी आयोगास सादर केले की, प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ. व का.) के/पूर्व यांनी दि.०८-०३-२०२१ च्या आदेशान्वये अपिलकर्तास अर्जाचे उत्तर व त्यानुषंगाने त्यांना हवी असलेली व कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेल्या माहितीची कागदपत्रे ७ दिवसात विनामूल्य द्यावी असे आदेश पारित केले. आदेशाची प्रत आयोगात सादर करण्यात आली आहे.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांनी आयोगास सादर केले की, सदर प्रकरण जुने असून कोविड-१९ च्या काळात अर्ज दाखल करण्यात आला होता. माहिती अर्जातील विषय त्यांचेशी संबंधित नसल्याचे दि.१९-०३-२०२५ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता (ईमारत प्रस्ताव) प.उप. यांचे कार्यालयास पुढील कार्यवाहीकरीता पाठवून अपिलकर्तास तसे कळविण्यात आले आहे. जन माहिती अधिकारींनी पत्राची प्रत आयोगात सादर केली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारींनी अपिलकर्तांना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

21-3-2025

**मुंबई**
**दिनांक : २१-०३-२०२५**

**( डॉ.प्रदीप व्यास )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**